दूरध्वनी : 25331211
25331590

# ठाणे महानगरपालिका ठाणे

महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे- 400 602.
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ क्र./ठा.म.पा/स्था.मा.वि/कार्या.अधि. - 6569 दिनांक 07/01/2019

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## स्थावर मालमत्ता विभाग,

## जाहिर सूचना

याव्दारे जाहिर आव्हान करण्यात येते की, अर्जदार श्री.नितीन सहदेव ढमाले, यांचा दि. 21/04/2010, रोजीचा अर्ज प्राप्त आहे.

अर्जात त्यांनी ठामपा ने मंडई सर्व्हे केला तेव्हा माझे दुकान बंद होते. तसेच वडिलांच्या आजारपणामुळे मी पाठपुरावा करु शकलो नाही. माझ्या आजूबाजूच्या श्री.किशोर सदानंद दाभाडे व श्री. श्रीकांत जाधव या गाळेधारकांच्या नावाची नोंद स्थावर मालमत्ता विभागाच्या रजिस्टरला झाली आहे. कृपया आपण माझ्या नावाची आपल्या स्थावर मालमत्ता रजिस्टरमध्ये जिजामाता भाजी मार्केटच्या यादीला नोंद करावी असे नमूद केले आहे.

श्री.नितीन सहदेव ढमाले, यांचे नावे सदरचा गाळा नोंद होणेकरिता सत्यप्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सदर नोंदणीस कोणाचे हक्क, आक्षेप किंवा कोणाचे हक्क प्रस्थापित होत असल्यास आवश्यक त्या पुराव्यांसह सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासुन 07 दिवसाच्या आत उपआयुक्त, स्थावर मालमत्ता विभाग, ठाणे महानगरपालिका,ठाणे येथे आपल्या हरकती लेखी स्वरुपात द्याव्यात. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कार्यालयीन अधिक्षक
स्थावर मालमत्ता विभाग,
ठाणे महानगरपालिका,ठाणे